राष्ट्रीय वनीकरण कार्यक्रम (६० : ४०) केंद्र व राज्य योजने अंतर्गत सन २०१५-१६ करिताचा बांधील व पुर्वपावसाळी कामांचा प्रस्ताव.

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग,

शासन निर्णय क्रमांक : एफडीएम-२०१५/प्र.क्र.२४३/फ-२

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड

मंत्रालय,मुंबई-४०० ०३२,

दिनांक :- ३० जानेवारी, २०१६

वाचा :- १) वित्त विभाग, शासन परिपत्रक, क्र.अर्थसं-२०१५/प्र.क्र.८५/अर्थ-३, दि.१७.०४.२०१५.

२) पर्यावरण व वन मंत्रालय, भारत सरकार यांचे पत्र क्र.MoEF&CC (NAEB) : २-१ /२०१५-B-III, दि.२३.०७.२०१५

३) पर्यावरण व वन मंत्रालय, भारत सरकार यांचे पत्र क्र.MoEF&CC (NAEB) : २-१ /२०१५-B-III, दि.२३.०७.२०१५

४) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१५/प्र.क्र.१११/अर्थ-३, दि.३०.०६.२०१५

५) वित्त विभाग, भारत सरकार यांचे अ.शा.पत्र क्र.३२/पीएसओ/एफएस/२०१५, दि.२८.१०.२०१५

६) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र.कक्ष-१/सी/मरावविय‍ं/प्र.क्र.०२/वाकृआ/२०१५-१६/१४४८, दि.०४.११.२०१५.

७) पर्यावरण व वन मंत्रालय, भारत सरकार यांचे पत्र क्र.MoEF&CC (NAEB) : २-१ /२०१५-B-III, दि.२७.११.२०१५

८) पर्यावरण व वन मंत्रालय, भारत सरकार यांचे पत्र क्र.MoEF&CC (NAEB) : २-१ /२०१५-B-III, दि.२७.११.२०१५

९) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.पूरक-२०१५/प्र.क्र.२०१/अर्थसंकल्प-३, दि.०१.०१.२०१६

१०) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१५/प्र.क्र.८५/अर्थ-३, दि.१२.०१.२०१६

प्रस्तावना :-

वन विभागांतर्गत सुरु असलेली राष्ट्रीय वनीकरण कार्यक्रम ही केंद्र पुरस्कृत योजना सन २०१५-१६ पासून १०० % केंद्र हिस्स्याऐवजी केंद्र व राज्य शासन यांच्या अनुक्रमे ६० : ४० हिस्स्यातून राबविण्याचा निर्णय केंद्र शासनाच्या संदर्भ क्र.५ येथील दि.२८.१०.२०१५ रोजीच्या अर्ध शासकीय पत्रान्वये घेण्यात आला आहे. त्याअनुषंगाने राष्ट्रीय वनीकरण कार्यक्रम या योजनेअंतर्गत सर्वसाधारण घटकाकरिता बांधील व पुर्वपावसाळी कामांकरिता एकूण रु.३०२७.०४ लक्ष इतक्या रक्कमेच्या प्रस्तावास केंद्र शासनाने संदर्भ क्र.७ येथील दि.२७.११.२०१५ रोजीच्या पत्रान्वये मान्यता प्रदान

केलेली आहे. सदर मान्यतेनुसार केंद्र शासनाच्या ६० % हिस्स्याप्रमाणे एकूण रु.१८१६.२२ लक्ष + रु.२०१.८० लक्ष (१० % फ्लेक्सी फंड) याप्रमाणे एकूण रु.२०१८.०३ लक्ष इतके केंद्र शासनाचे दायित्व राहणार आहे. त्यामुळे सदर योजनेकरिता प्रथम हफ्त्यापोटी रु.१००९.०२ लक्ष इतका हफ्ता केंद्र शासनाने मंजूर केला आहे. त्याअनुषंगाने संदर्भ क्र.२ येथील **दि.२३.०७.२०१५ रोजीच्या पत्रान्वये रु.४२९.५७ लक्ष संदर्भ क्र.७ येथील दि.२७.११.२०१५ रोजीच्या पत्रान्वये रु.४१८.९२ लक्ष याप्रमाणे एकूण रु.८४८.४९ लक्ष** इतका निधी राज्य शासनाकडे सुपूर्द केला आहे. तसेच सदर योजनेअंतर्गत मागील वर्षाचा अखर्चित असलेला रु. १६०.५३ लक्ष इतका निधी शिल्लक आहे.

२. त्याचप्रमाणे सदर योजनेअंतर्गत अनुसूचित जाती उप योजना या घटकाकरिता बांधील व पुर्वपावसाळी कामांकरिता एकूण रु.३१३.४४ लक्ष इतक्या रक्कमेच्या प्रस्तावास केंद्र शासनाने संदर्भ क्र.८ येथील दि.२७.११.२०१५ रोजीच्या पत्रान्वये मान्यता प्रदान केलेली आहे. सदर मान्यतेनुसार केंद्र शासनाच्या ६० % हिस्स्याप्रमाणे एकूण रु.१८८.०६ लक्ष + रु.२०.९० लक्ष (१० % फ्लेक्सी फंड) याप्रमाणे एकूण रु.२०८.९६ लक्ष इतके केंद्र शासनाचे दायित्व राहणार आहे. त्यामुळे सदर योजनेकरिता प्रथम हफ्त्यापोटी रु.१०४.४८ लक्ष इतका हफ्ता मंजूर केला आहे. त्याअनुषंगाने संदर्भ क्र.३ येथील **दि.२३.०७.२०१५ रोजीच्या पत्रान्वये रु.५९.५६ लक्ष व संदर्भ क्र.८ येथील दि.२७.११.२०१५ रोजीच्या पत्रान्वये रु.२५.५३ लक्ष** याप्रमाणे एकूण रु.८५.०९ लक्ष इतका निधी राज्य शासनाकडे सुपूर्द केला आहे. तसेच सदर योजनेअंतर्गत मागील वर्षाचा अखर्चित असलेला रु. १९.३९ लक्ष इतका निधी शिल्लक आहे.

३. सदर योजना यापुर्वी १०० % केंद्र पुरस्कृत होती. त्यामुळे सन २०१५-१६ या वर्षाकरिता सदर योजनेअंतर्गत सर्वसाधारण घटकाकरिता २४०६८४८२ या संकेतांकाअंतर्गत रु.५०००.०० लक्ष तर अनुसूचित जाती उप योजना या घटकाकरिता २४०६८४९१ या संकेतांकाअंतर्गत रु.११००.०० लक्ष इतका निधी अर्थसंकल्पित करण्यात आला होता. परंतू वित्त विभागाच्या संदर्भ क्र.५ येथील पत्रान्वये सदर योजनेच्या सुधारीत हिस्स्याच्या अनुषंगाने सर्वसाधारण घटकाच्या ४० % राज्य हिस्स्याकरिता २४०६A०१३ या संकेतांकामध्ये रु.१३१९.४९ लक्ष व अनुसूचित जाती उप योजनेच्या ४० % राज्य हिस्स्याकरिता २४०६A०२२ संकेतांकामध्ये रु.१३७.०८ लक्ष इतका निधी सन २०१५ च्या हिवाळी अधिवेशनामध्ये **पुरक मागणीद्वारे अर्थसंकल्पित करण्यास विधानमंडळाची मान्यता मिळालेली असून, त्यासंदर्भात वित्त विभागाने संदर्भ क्र.९ वरील दि.०१.०१.२०१५ रोजी परिपत्रक निर्गमित केलेले आहे.**

४. उपरोक्त वस्तुस्थितीच्या अनुषंगाने, सदर योजनेअंतर्गत सर्वसाधारण व अनुसूचित जाती उप योजना या घटकांकरिता केंद्र शासनाकडून ६० % हिस्स्याच्या अनुषंगाने प्राप्त झालेला निधी व त्यास अनुसरुन राज्य शासनाचा ४० % निधी वितरित करण्याचा प्रस्ताव अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास) महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी संदर्भ क्र.६ येथील दि.०४.११.२०१५

रोजीच्या पत्रान्वये शासनास मान्यतेसाठी सादर केलेला असून सदरचा निधी वितरीत करावयाची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

<u>शासन निर्णय</u> :-

५. उपरोक्त वस्तुस्थितीचा विचार करता, केंद्र शासनाने संदर्भ क्र.२ व ३ वरील दि.२३.०७.२०१५ रोजीच्या दोन पत्रान्वये आणि संदर्भ क्र.७ व ८ वरील दि.२७.११.२०१५ रोजीच्या दोन पत्रान्वये सर्वसाधारण व अनुसूचित जाती उप योजना या घटकांकरिता प्रथम हफ्त्यापोटी मंजूर व वितरीत केलेला निधी व त्याअनुषंगाने राज्य शासनाच्या हिस्स्यांकरिता निधी खालीलप्रमाणे उद्दिष्टनिहाय महाराष्ट्र राज्य वनविकास यंत्रणा तथा अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना या शासन निर्णयान्वये वितरित करण्यात येत आहे :-

(रक्कम लाखात)

अ. क्र.	लेखाशीर्ष / संकेतांक	०२ मजूरी	२१ पुरवठा व सामग्री	५० इतर खर्च	**एकूण**
१	"राष्ट्रीय वनीकरण कार्यक्रम **(सर्वसाधारण) (६० % केंद्र हिस्सा) (२४०६ ८४८२)**	५९३.९४	१६९.७०	८४.८५	**८४८.४९**
२	"राष्ट्रीय वनीकरण कार्यक्रम **(सर्वसाधारण) (४० % राज्य हिस्सा) (२४०६ A०१३)**	४७०.८७	१३४.५३	६७.२७	**६७२.६७**
३	"राष्ट्रीय वनीकरण कार्यक्रम **(अनुसूचित जाती उपयोजना) (६० % केंद्र हिस्सा) (२४०६ ८४९१)**	५९.५६	१४.९०	१०.६३	**८५.०९**
४	"राष्ट्रीय वनीकरण कार्यक्रम **(अनुसूचित जाती उपयोजना) (४० % राज्य हिस्सा) (२४०६ A०२२)**	४८.७६	१२.२०	८.७०	**६९.६६**

६. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी सदर निधी या विभागाकडून मंजूर केलेल्या प्रस्तावातील क्षेत्र / कार्यक्रम / कामे यावरच खर्च होईल व कामाची

द्विरुक्ती होणार नाही आण मंजूर कामांव्यतिरिक्त कोणत्याही नवीन बाबीवर /नवीन क्षेत्रावर/ नवीन कामांवर खर्च करण्यात येणार नाही याची दक्षता घ्यावी. तसेच सदरहू निधी वितरित करण्यापूर्वी प्रस्तावानुसार योजनेतील निश्चित केलेल्या कामांना सक्षम अधिका-यांची तांत्रिक व प्रशासकीय मंजूरी असल्याची व त्याचबरोबर सध्या वाटप करण्यात येणा-या अनुदानातून खर्च करताना यामध्ये कोणतीही वित्तिय अनियमितता होणार नाही याची दक्षता घ्यावी. त्याचप्रमाणे वित्त विभागाच्या दि.१७.०४.२०१५ रोजीच्या शासन परिपत्रकातील अटी व शर्तींची पूर्तता करण्यात येईल याची देखिल दक्षता घ्यावी.

७. सदर योजनेवर केंद्र हिस्स्याकरिता होणारा खर्च मागणी क्र.सी-७, प्रधान शीर्ष - २४०६ वनीकरण व वन्यजीवन, ०१, वनीकरण, १०२ सामाजिक व क्षेत्रीय वनीकरण, केंद्र पुरस्कृत योजना, (१२) राष्ट्रीय वनीकरण कार्यक्रम, (११) सामाजिक व क्षेत्रीय वनीकरण, केंद्रीय पुरस्कृत योजना, **(११) (१९)** राष्ट्रीय वनीकरण कार्यक्रम (६० % केंद्र हिस्सा) **(सर्वसाधारण) (२४०६ ८४८२)** आणि **(११) (२०)** राष्ट्रीय वनीकरण कार्यक्रम (६० % केंद्र हिस्सा) **(अनुसूचित जाती उपयोजना) (२४०६ ८४९१)** या दोन लेखा शिर्षाअंतर्गत सन २०१५-१६ मध्ये मंजुर होणा-या अनुदानातुन भागविण्यात यावा.

८. त्याचप्रमाणे, सदर योजनेवर राज्य हिस्स्याकरिता होणारा खर्च मागणी क्र.सी-७, प्रधान शीर्ष - २४०६ वनीकरण व वन्यजीवन, ०१, वनीकरण, १०२ सामाजिक व क्षेत्रीय वनीकरण, केंद्र पुरस्कृत योजना, (१२) राष्ट्रीय वनीकरण कार्यक्रम, (११) सामाजिक व क्षेत्रीय वनीकरण, केंद्रीय पुरस्कृत योजना, **(११) (२४)** राष्ट्रीय वनीकरण कार्यक्रम (४० % राज्य हिस्सा) **(सर्वसाधारण) (२४०६ A०१३)** आणि ७८९, अनुसूचित जाती उप योजना, (०१) सामाजिक व क्षेत्रीय वनीकरण, (०१) **(०१)** राष्ट्रीय वनीकरण कार्यक्रम (४० % राज्य हिस्सा) **(अनुसूचित जाती उपयोजना) (२४०६ A०२२)** या दोन लेखा शिर्षाअंतर्गत सन २०१५-१६ मध्ये मंजुर होणा-या अनुदानातुन भागविण्यात यावा.

९. सदर शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय विभागाच्या सहमतीने आणि वित्त विभागाचे दि.१७.०४.२०१५, दि.३०.०६.२०१५ व दि.१६.०१.२०१६ रोजीच्या परिपत्रकान्वये प्राप्त सहमतीनुसार तसेच वित्त विभागाचा शासन निर्णय क्र.विअप्र-१०.०८/प्र.क्र.७०/ २००८/विनियम, दि.१५.०५.२००९ भाग पहिला उपविभाग-३ परिच्छेद २७ (२) अन्वये विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

१०.   सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०१३०१७५२४०१५१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,

Dattatraye Laxman Thorat

Digitally signed by Dattatraye Laxman Thorat
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Joint Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Dattatraye Laxman Thorat
Date: 2016.01.30 17:53:04 +05'30'

(डी.एल.थोरात)
सह सचिव
महसूल व वन विभाग

प्रति :-

१) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
२) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
३) मुख्य वनसंरक्षक (प्रा.), सर्व
४) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/ लेखा परीक्षा), १/२ महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.
५) सह सचिव /उप सचिव (अर्थ-६) /व्यय-१०/अर्थोपाय, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
६) सह सचिव /उप सचिव (विशेष घटक योजना), सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
७) उप सचिव (कार्यासन १४७५), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
८) ब-१ कार्यासन, महसूल व वन विभाग,मंत्रालय,मुंबई-३२.
९) निवडनस्ती, फ-२ कार्यासन,महसूल व वन विभाग, मंत्रालय,मुंबई-३२.